*MHNS290004432023*

वसंतु बेंडु शिद
वि.
श्रीमती राणाबाई बहिरू व इतर

**नियमित दिवाणी दावा क्र.३८/२०२३**
**<u>आदेश निशाणी क्र.२९ वर</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना जबाब/कैफीयत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी केला आहे.

२. सदर अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना दाव्याचे समन्स तामिल झाले व ते वकीलांमार्फत हजर झाले. परंतु पुरेशा माहिती अभावी व कागदपत्रांची जुळवाजूळव करण्यात व प्रतिवादी वयोवृध्द असल्याने जबाब/कैफियत मुदतीत दाखल करता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी कैफीयत/जबाब दाखल करण्यासाठी झालेला उशीर माफ करण्याची विनंती केली.

३. सदर अर्जावर वादी यांचे म्हणणे मागविले असता, त्यांनी हरकत नोंदवून प्रतिवादी यांना कॉस्ट लावणेबाबतचे कथन केले आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन व अर्जातील कथनांचा विचार करता तसेच प्रकरण गुणदोषावर चालविण्यासाठी प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करण्यास परवानगी देणे योग्य वाटते. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी अर्जासोबतच आपले लेखी म्हणणे दाखल केले आहे. करीता, मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

निशाणी २९ वरील अर्ज मंजूर करण्यात येवून अभिलेखावर दाखल केलेली कैफीयत/जबाब स्विकारण्यात येतो.

सही/—
दि.१४.१२.२०२३. (माधव एस. बोराळे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, इगतपुरी.
(J.O. Code :- MH02022)

Visit **ecourts.gov.in** for updates or download mobile app “**eCourts Services**” from Android or iOS